भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०१/२०१७

**३) संगनमत करून बंडीचे उभारीने डोक्यावर व हातावर मारून तिन जखमी :–**

दिनांक १९/०१/२०१७ चे ०६.३० वा. दर. यातील दोन्ही आरोपींतानी संगनमत करून अंगनात सारवन करण्याच्या कारना वरून भांडण करून, शिवीगाळ करून थापड बुक्यानी मारले व व आरोपी क्र.०२ ने बंडीचे उभारीने फिर्यादीचे उजव्या हातावर व फिर्यादीची पत्नी सौ. सत्यभामा वय ६० वर्ष रा.हिचे डोक्यावर व मुलगा ईश्वर वय २८ वर्ष याचे डोक्यावर मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४, ५०४, ५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परसुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) ९० टक्के जळाल्याने महीलेचा मृत्यु. :–**

दिंनाक १२/०१/२०१७ रोजी ११.३० वा. दर. यातील मृतक सौ. सुशीला उदाराम तरारे वय ५० वर्ष रा. आमगाव ही दि. १२/.१/१७ ला दही विकुन घरी आली व आंघोळी करीता पाणी गरम करण्याकरीता मातीच्या तेलाने चुल पेटवली व चुली जवळ बसुन पैसे मोजत असता तिचा हात चुलीजवळ असलेल्या मातीच्या तेलाचे डपकीला लागुन मातीचा तेल खाली पडुन विस्तवाचा भडका उडाल्याने मृतक ही ९० टक्के जळाली औषध उपचार दरम्यान दि. १९/०१/२०१७ चे ०६.३० वा. सा. रू. भंडारा येथे मरण पावल्याने फिर्यादी परसराम उदाराम तरारे वय ३० वर्ष रा. आमगाव (दिघोरी) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो. स्टे. कारधा हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १९/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४९ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.